**ठळक बातम्या**

- गेल्या महिन्यात किरकोळ किमतीवर आधारित चलन फुगवट्याचा दर ३ पूर्णांक ५४ शतांश टक्क्यापर्यंत खाली, जूनमधे औद्योगिक उत्पादनात ४ पूर्णांक २ दशांश टक्के वाढ
- प्रधानमंत्री- सूर्य घर- मोफत वीज योजनेंतर्गत आदर्श सौर गावांच्या निवड प्रक्रियेसाठी केंद्र सरकारचे निर्देश जारी
- महाराष्ट्रात जिल्हाकेंद्री विकासाला चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता बळकटीकरण प्रकल्पाची मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सुरुवात
- देशातल्या शैक्षणिक संस्थांच्या मानांकनात आयआयटी मद्रास पहिल्या, तर आयआयटी मुंबई तिसऱ्या स्थानावर

**आणि**

- तामिळनाडू, पुद्दुचेरी, केरळ, अरुणाचल प्रदेश, उत्तराखंड आणि पूर्व राजस्थानात पुढचे तीन दिवस जोरदार पावसाचा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

या वर्षीच्या जुलै महिन्यात किरकोळ किमतीवर आधारित चलन फुगवट्याचा दर ३ पूर्णांक ५४ शतांश टक्क्यापर्यंत खाली आला. गेल्या ५९ महिन्यांतला हा सर्वात कमी दर आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं आज ही आकडेवारी जाहीर केली. या आकडेवारीनुसार, भाजीपाला, फळं आणि मसाल्यांचे दर घसरल्यामुळं गेल्या महिन्यात ग्राहक किंमत निर्देशांकात घसरण झाली.

यंदा जून महिन्यात देशातल्या औद्योगिक उत्पादनात ४ पूर्णांक २ दशांश टक्के वाढ झाल्याची माहिती, सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं दिली आहे. खणन क्षेत्रात १० पूर्णांक ३ दशांश टक्के, कारखानदारी क्षेत्रात २ पूर्णांक ६ दशांश टक्के, तर वीज क्षेत्रात ८ पूर्णांक ६ दशांश टक्के वाढ नोंदवली गेली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री-सूर्य घर-मोफत वीज योजनेंतर्गत आदर्श सौर गावांची निवड करण्याची प्रक्रिया सुरु करण्यासाठी केंद्र सरकारनं निर्देश जारी केले आहेत. या योजनेंतर्गत देशभरातल्या प्रत्येक जिल्ह्यातलं ५ हजाराहून अधिक लोकसंख्येचं एकेक गाव आदर्श सौर ग्राम म्हणून विकसित केलं जाणार आहे. विशेष दर्जा प्राप्त असलेल्या राज्यांमधल्या गावांसाठी लोकसंख्येबाबतची अट काहीशी शिथिल राहणार आहे. निवडलेल्या गावांना सौर ऊर्जा यंत्रणा उभारणीसाठी प्रत्येकी १ कोटी रुपयांचं अनुदान मिळेल. मात्र या योजनेंतर्गत निवड करण्यापूर्वी संबंधित जिल्हा स्तरीय समितीनं शिफारस केलेल्या प्रत्येक गावाची पुनर्नवीकरणीय ऊर्जा वितरणाची क्षमता पडताळली जाणार असल्याचं या मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

हा उपक्रम नागरिकांना त्यांच्या घरांच्या छतांवर ऊर्जा निर्मिती करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राबवला जात असून त्याकरता केंद्र सरकारनं ८०० कोटी रुपयांचा निधी राखून ठेवला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात जिल्हाकेंद्री विकासाला चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता बळकटीकरण प्रकल्पाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सुरुवात झाली. या प्रकल्पाला जागतिक बँकेकडून १ हजार ५६२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

‘मित्र’ अर्थात महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशनच्या नियामक मंडळाची बैठक आज मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी झाली. ‘मित्र’नं कृषी, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, पायाभूत सुविधा, ऊर्जा या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करावं, मुंबईसह मुंबई महानगर परिसरातल्या पूरक बाबींवर लक्ष केंद्रित करावं, तसंच सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी संशोधकांनी प्रयत्न करण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

यावेळी नीती आयोगाच्या धर्तीवर ‘मित्र’नं चार संस्थांशी नॉलेज पार्टनर म्हणून सामंजस्य करार केला.

**<><><><><>**

महाराष्ट्रात आरक्षणाच्या मुद्यावरुन दोन समाजात कटुता निर्माण होणार नाही याची काळजी सर्वांनी घ्यायला हवी, यासाठी मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठक बोलावून यावर तोडगा काढावा, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. राज्यात सौहार्द निर्माण करण्यासाठी या बैठकीत एकमताने जो निर्णय होईल तो आपल्याला मान्य असेल असंही पवार यांनी सांगितलं.

आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यापेक्षा जास्त वाढवता येणार नाही, हा न्यायालयाचा निर्णय आहे. त्यामुळे राज्यातल्या सर्व पक्षांनी मतभेद विसरून केंद्र सरकारकडे आरक्षणाची मर्यादा वाढवण्याची मागणी करावी, त्यासाठी आपल्या पक्षाचा पाठिंबा असेल, असंही पवार म्हणाले.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी अभिनेते सुमीत राघवन म्हणाले....

**होल्ड--बाईट - सुमीत राघवन**

**<><><><><>**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं देशभरातल्या शैक्षणिक संस्थांचं मानांकन जाहीर केलं आहे. या यादीत सर्वसाधारण गटात पहिला क्रमांक आयआयटी मद्रासने पटकावला असून आयआयटी मुंबई तिसऱ्या स्थानावर आहे. दुसरा क्रमांक बंगळुरूच्या इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ सायन्स ला मिळाला आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नवी दिल्लीत एका कार्यक्रमात ही मानांकनं जाहीर करताना सांगितलं की यंदापासून कौशल्य विद्यापीठ, मुक्त विद्यापीठ आणि राज्यसरकारी विद्यापीठ अशा आणखी तीन गटातही शैक्षणिक संस्थांना मानांकनं मिळणार आहेत. एकूण १६ गटांमधे ही मानांकनं देण्यात आली असून सर्वसाधारण गटात महाराष्ट्रातल्या १० संस्थांचा समावेश आहे. अभियांत्रिकी गटात आयआयटी मुंबई तिसऱ्या क्रमांकावर आहे. वैद्यकीय शिक्षण गटात डी वाय पाटील विद्यापीठ ११व्या क्रमांकावर आहे तर कायद्याचं शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या गटात पुण्याचं सिम्बायोसिस लॉ स्कूल पाचव्या क्रमांकावर आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या महिन्याच्या २५ तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा ११३ वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरीकांनी आपल्या सूचना आणि विचार येत्या २३ तारखेपर्यंत १८००-११-७८०० या नि:शुल्क क्रमांकावर, नरेंद्र मोदी ॲप वर किंवा माय जीओव्ही ओपन फोरमवर नोंदवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात पाणमांजर, गिधाड, रानम्हैस यांच्या प्रजनन केंद्रासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली आहे. राज्य वन्य जीव मंडळाच्या आज मुंबईत झलेल्या बैठकीत हा निर्णय झाला. यावेळी पेंच इथं पाणमांजर, नाशिकमधे गिधाड, तर गडचिरोलीत रानम्हैस प्रजनन केंद्र उभारण्याविषयी चर्चा झाली. राज्यात दुर्मिळ होत असलेल्या वनस्पतींच्या जतन आणि संवर्धनावर भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. सातारा जिल्ह्यातल्या जावळीच्या जंगलात ५०० प्रकारच्या दुर्मिळ वनस्पती असल्याचं सांगत, त्याठिकाणी संशोधन आणि विकास केंद्र सुरू करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यावेळी संरक्षित क्षेत्र आणि पर्यावरण

संवेदनशील क्षेत्र, व्याघ्र भ्रमण मार्गातल्या चार विकास प्रकल्पांना मान्यता देण्यात आली.

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या कुटुंबातल्या सदस्याला वनमजूर म्हणून सामावून घेण्याचा निर्णय देखील मुख्यमंत्र्यांनी घेतला.

**<><><><>**

जम्मू-काश्मीर मधल्या श्रीनगर मध्ये तिरंगा यात्रेसह तिरंगा स्वाक्षरी मोहीम सुरु झाली आहे. जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी आज या यात्रेसह स्वाक्षरी मोहीमेचं उद्घाटन केलं. हजारो नागरिकांचा समावेश असलेल्या तिरंगा यात्रेत सिन्हा स्वतः सहभागी झाले होते. जम्मू काश्मीरमधल्या हर घर तिरंगा मोहीमेचं सामाजिक चळवळीत रूपांतर झालं असल्याचं ते यावेळी म्हणाले. या मोहिमेत अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावं असं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

**<><><><>**

भारतीय शेअर बाजारातल्या सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही निर्देशांकांमध्ये आज दिवसभर चढउतार पाहायला मिळाले. आज दिवस अखेर मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ५७ अंकांनी घसरून ७९ हजार ६४९ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २१ अंकांनी घसरून २४ हजार ३४७ अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

हिंडेनबर्ग रिसर्चनं केलेले आरोप सेबी म्हणजे भारतीय रोखे आणि विनिमय मंडळानं फेटाळले असून, या पार्श्वभूमीवर शांत चित्तानं प्रतिक्रिया द्यावी, असं आवाहन गुंतवणूकदारांना केलं आहे. हिंडेनबर्ग रिसर्चनं केलेल्या आरोपांचं खंडन केलं आहे. हितसंबंधांमुळे निर्माण होणारे पेचप्रसंग हाताळण्यासाठी सेबीकडे पुरेसे नियम आणि सक्षम अंतर्गत यंत्रणा असल्याचं सेबीने म्हटलं आहे.

**<><><><><>**

पुढचे तीन दिवस तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, केरळ, माहे, अरुणाचल प्रदेश, उत्तराखंड आणि पूर्व राजस्थान याभागात जोरदार ते अतिजोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. मध्य प्रदेशचा पश्चिम भाग आणि रायलसीमा या भागांतही आज मुसळधार पाऊस पडेल. तसंच, हिमालयाच्या पश्चिमेकडचा प्रदेश तसंच पूर्व आणि ईशान्य भारतामध्ये हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. येत्या सहा ते सात दिवसात वायव्य भारताच्या सपाट भूभागावरही पाऊस होईल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**